# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र. रामाआ/२२६१/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१.

श्री.सिराज उस्मानगणी मुलाणी — अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी,
तडसर, तलाठी कार्यालय तडसर, ता. कडेगाव, जि. सांगली. — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
कडेगांव, तहसिल कार्यालय कडेगांव, जि. सांगली.

## द्वितीय अपील सुनावणी दिनांक २०/१२/२०२१

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०/०२/२०१७ | - | २०/०३/२०१७ | २६/०४/२०१७ |

अपिलार्थी यांनी दि १९/०५/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

' दि.०६/११/१९९६ चा फेरफार नोंदवहीतील नाव कोणत्या कागदपत्रांच्या आधारे कमी केली त्या अभिलेखांच्या सत्यप्रती व चालू सातबाराचा उतारा मिळावा. '

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'माहिती देण्यास टाळाटाळ' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक २०/०२/२०१७ रोजीचा असुन तो तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, तडसर, तलाठी कार्यालय तडसर, ता. कडेगाव, जि. सांगली यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती अर्जावर कार्यवाही केलेली .

२) सुनावणीचेवेळी तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी असे सुचित केले की, दि.२४/४/२०१७ च्या पत्राने अर्जदाराला माहिती पुरविली आहे.

३) सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी यांनी असे सुचित केले की, जन माहिती अधिकारी यांचे, दि.२४/४/२०१७ चे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

४) तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात,

५) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक २०/०३/२०१७ रोजीचे असून त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि २६/०४/२०१७ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये अपिलार्थीस १५ दिवसात विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिले.

६) सुनावणीचेवेळी तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी असे सुचित केले की, प्रथम अपिल सुनावणीस अपिलार्थी हजर होते त्यांना समक्ष माहिती दिली आहे तसेच दि.२६/६/२०१७ रोजी पोस्टाने माहिती पाठविली आहे.

७) अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना 'माहिती दिली नाही, आदेश दिला नाही.' असे प्रयोजन नमूद केले.

सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, तडसर, तलाठी कार्यालय तडसर, ता. कडेगाव, जि. सांगलीयांनी विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध कलम २० मध्ये नमुद तरतूदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे.

जावक क्र. 1376/2022/(सांगली)/22-61/2017 दिनांक - 13/6/2022

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-</u>

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय- सांगली, जि. सांगली.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/ प्र. क्र. २१९/०८/९(मा. अ.), दि. १०/०६/२००८ मधील सूचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना (नोंदणीकृत टपालाद्वारे)सदरचा आदेश बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.